**विशेष दिवाणी दावा क्रमांक – ०५ /२०१३**

**निशाणी क्र. १८५ /क**

वादीतर्फे साक्षीदार क्र. ०३ यांचा जबाब

माझे नांव - प्राजक्ता दिनेश नानीवडेकर

वर्षे - ३३ धंदा - डेप्युटी मॅनेजर, स्टेट बँक इंडिया, कराड

रा. कराड, जि. सातारा.

**सरतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. ए.टी. तांबे यांचे मार्फत शपथेवर सुरु -**

मी ऑगस्ट २०२५ पासुन स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा - शनिवार पेठ, कराड येथे डेप्युटी मॅनेजर म्हणुन कार्यरत आहे. मला बँकेने साक्ष देणेसाठी अधिकारपत्र दिले आहे. त्यावर आमच्या बँकेचे मुख्य प्रबंधक, आय.एन. हुलगेरी यांची सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या अधिकारपत्रावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. १८६** देणेत येते.

२. मी खातेदार माणिक गणपती डिंगणे यांचा खाते उतारा या कामी हजर केलेला आहे. सदरचा उतारा दिनांक ३१/१२/२०१३ ते ३१/१२/२०१४ अखेरचा आहे. बँकेच्या रेकॉर्डप्रमाणे सदरचा खाते उतारा बरोबर आहे. त्यासोबत पुरावा कायद्यातील तरतुदी प्रमाणे प्रमाणपत्र जोडले आहे. खाते उतारा व प्रमाणपत्रावर बँकेचे मुख्य प्रबंधक यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. १८७ व १८८** देणेत येते. (प्रतिवादीचे वकिलांनी प्रमाणपत्रास निशाणी देणेस हरकत घेतली). सदर खाते उता-यावर धनादेश क्र.६२७९५७, ६२७९५८ दिनांक ३१.१२.२०१३ प्रत्येकी रक्कम रुपये १५,००,०००/- भरल्याबाबत अथवा वटले बाबत नोंद नाही.

**उलटतपास प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. एस. बी. दरिबे यांचे तर्फे सुरु :-**

३. मी बँकींग क्षेत्रात डिसेंबर २०१७ पासुन कार्यरत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खाते उता-यावर खातेदाराला दिलेल्या चेक बुकची नोंद असते. चेक बुक

दिल्याची नोंद ही आमचे सिस्टीममध्ये असते. सन २०१५ साली चेक बुक कसे दिले जात होते हे मला माहित नाही. मी वादातील धनादेशाची काही चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माणिक गणपती डिंगणे यांची केवायसी कागदपत्रे मी आजरोजी आणलेली नाहीत. नि.क्र. १८८ चे प्रमाणपत्राची कायदेशीर पुर्तता काय असते याची मला माहिती नाही. नि.क्र. १८७ च्या खाते उता-याची संगणकीय प्रत मी बँकेच्या संगणकावरुन काढली. प्रत्येक खातेदाराचा अंदाजे १०-१५ वर्षाचा डाटा बँकेच्या सिस्टीममध्ये असतो. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. १८७ च्या खाते उता-यातील नोंदी मी स्वत: केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, ३१/१२/२०१३ ते ३१/१२/२०१४ या कालावधीतील नोंदीची मला प्रत्यक्ष माहिती नाही. वादातील धनादेश हे बँकेत संबंधित कालावधीत हजर केले नसलेने त्या धनादेशांचे काय झाले याबाबत मी काही सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्वीकृत्त,

Digitally signed by GANI MANIK NADAF
Date: 2025.11.26 11:07:26 +0530

दिनांक – २५.११.२०२५

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.